मास्क व सॅनिटायझरचे वाटप
(सकाळच्या सकाळ शिलेदार - कोरोना योध्दा) पुरस्कार

# गरजूंच्या पाठिशी श्री पांडुरंग



निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात कोरोना योद्ध्यांना मास्क व सॅनिटायझरचे वाटप करताना उपस्थित मान्यवर.

संपूर्ण विश्व कोरोनाच्या जागतिक महामारीने ग्रासले असताना या महामारीमुळे अनेकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले आहे. या संकटातून देशाला सावरण्यासाठी अनेक मदतीचे हात पुढे सरसावले. निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील श्री पांडुरंग ग्रामविकास प्रतिष्ठान व दिलीप वळसे पाटील महाविद्यालयाने देखील कोरोनाच्या पार्श्वभूमीवर फुल ना फुलाची पाकळी' म्हणून, निमगाव सावा पंचक्रोशी तसेच जुन्नर तालुक्यात विविध उपक्रम राबविले. दिलीप वळसे पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत 'कमवा व शिका' योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या ३ हजार ५०० मास्कचे व सॅनिटायझरचे, जुन्नर तालुक्यातील आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, प्रशासकीय कर्मचारी, पोलिस कर्मचारी, शिक्षक, आशा सेविका आदी विविध क्षेत्रातील कोरोना योद्ध्यांना मोफत वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.

जुन्नर तालुक्याचे कार्यकुशल आमदार अतुल बेनके, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान जिल्हा परिषद सदस्य तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या हस्ते हे वितरण करण्यात



आले. तसेच श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने जवळपास एक लाख रुपये किमतीचे अन्नधान्य गरीब व गरजू लोकांना वाटप करण्यात आले. कोरोनासारख्या संकटावर मात करून दक्षता कशी घ्यावी याबाबतची जनजागृतीही करण्यात आली. याकामी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सभासद तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी विशेषत: विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी मोलाची व महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

छत्रपती शिवरायांच्या पवित्र जन्मभूमीत तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जुन्नर तालुक्यातील निमगाव सावा येथे, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग पवार यांच्या प्रयत्नातून व कामगारमंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचालित 'दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची' स्थापना झाली. या महाविद्यालयात आजमितीला जवळपास १ हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक उपक्रमांबरोबरच संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या उक्तीप्रमाणे समाज विकासासाठी संस्था अविरतपणे कार्यरत आहे.

Pune, Khed-Today
24/02/2021 Page No. 9

Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

DVP College Nimgaon Sawa

177

178

DVP College Nimgaonsawa



Principal
Dilip Walase Patil
Arts, Commerce & Science College
Nimgaonsawa, Tal.Junnar (Pune)

सकाळ

# सलाम
## कोरोना योद्ध्यांना
## सन्मानपत्र

### सन्माननीय दिलीप वळसे पाटील महाविद्यालय

सुरुवातीला स्वसंरक्षणाची कोणतीही साधने नसताना, संसर्गाचा धोका पत्करून कोरोनारुपी शत्रूला डॉक्टर, पोलिस, परिचारिका, रुग्णालयातील कर्मचारी प्रथम सामोरे गेले आणि अजूनही त्यांचे काम अविरतपणे सुरू आहे. या सर्वांचे हे कार्य समाजाच्या सदैव स्मरणात राहील. म्हणूनच ‘सकाळ’ने या कार्याचा सन्मान करण्याच्या उद्देशाने **‘सलाम कोरोना योद्ध्यांना’** या पुस्तकाची संकल्पना राबविली व याकरता आपण मोलाचे सहकार्य केले, म्हणून **‘सकाळ’च्या वतीने आपल्याला सन्मानपत्र** देऊन गौरविण्यात येत आहे.

**सम्राट फडणीस**